| | |
|---|---|
| MHSN060000491989 | **<u>नियमित दिवाणी दावा : ७९/१९८९</u>**<br>शामराव पोवार (मयत) तर्फे वारस वि.<br>श्रीमती. हौसाबाई चव्हाण (मयत) तर्फे वारस |

## <u>निशाणी १६७ वरील आदेश</u>

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी दाखल केला असून त्यांचे कथनानुसार प्रस्तुत दावेमधील प्रतिवादी क्र.१/२ पांडुरंग श्रीपती चव्हाण हे दि.१६/०९/२०२० रोजी तसेच प्रतिवादी क्र.१/३ गोरखनाथ श्रीपती चव्हाण हे दि.१५/०५/२०२२ रोजी मयत झाले आहेत. त्यामुळे सदर प्रतिवादीचे वारस अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. मुदतीच्या कायद्यानुसार ९० दिवसांचे आत मयताचे वारस अभिलेखावर आणणे आवश्यक आहे. परंतु मुदतीत वारस रेकॉर्डवर आणले नसल्यामुळे मयत प्रतिवादी क्र.१/२ व १/३ यांचे विरुध्द दावा अबेट झाला आहे. तसेच वादी क्र.२/१ काशीबाई यशवंत पवार या दि.१९/०१/२०२२ रोजी व प्रतिवादी क्र.१/४/१ पद्मीनी ज्ञानदेव चव्हाण या दि.०५/०६/२०१८ रोजी मयत झाल्या आहेत. तथापि त्यांचे बाबतही झालेला अबेटमेंट सेट असाईडचा आदेश रदद होणे गरजेचे आहे. त्यामुळे मयत प्रतिवादी क्र.१/२, १/३, १/४/१ व वादी क्र.२/१ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द होवून मिळणेकरिता वादीने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. प्रतिवादी क्र.१/२, १/३ यांनी नि.१७१ कडे व प्रतिवादी क्र.१/२(क) यांनी नि.१७२ कडे सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज मंजूर करणेस त्यांची काहीही हरकत नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादी क्र.१.६ यांनी नि.१७८ कडे सदर अर्जास त्यांचे म्हणणे दाखल करुन हरकत घेतली आहे. त्यांचे कथनानुसार, प्रस्तुत कामातील प्रतिवादी क्र.१/२ हे मयत होऊन तीन वर्षांपेक्षा तसेच प्रतिवादी क्र.१/३ हे मयत होऊन दोन वर्षांपेक्षा अधिक कालावधी झाला आहे. तसेच सदर मयत प्रतिवादींचे वारस वेळेत रेकॉर्डवर आणले नाहीत याबाबत वादी यांनी कोणतेही संतोषजनक कारण किंवा पुरावा दिलेला नाही. वादींनी अर्जात नमूद केलेली कारणे ही फक्त औपचारिक आहेत.

वास्तविक वादी यांचे निष्काळजीपणामुळे दावा प्रतिवादी क्र.१/२, १/३, १/४/१ व वादी क्र.२/१ यांचे विरुध्द अबेट झालेला आहे. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली. तसेच मे. न्यायालय अर्ज मंजूर करण्याच्या निर्णयाप्रत आलेस वादी यांना जास्तीत जास्त खर्च बसविणेत यावा अशी त्यांनी विनंती केली.

**३.** अर्ज व त्यावरील म्हणणे वाचले. दाव्याची पाहणी केली. दोन्ही वकीलांचा युक्तीवाद ऐकला. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा प्रतिवादीं विरुध्द पूर्वी दाखल केलेला रे.दि.मु.नं.२१३/१९६५ हा बेकायदेशीर असल्याचे जाहीर होऊन मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. वादी यांनी भारतीय मुदतीचा कायदा कलम ५ मधील आर्टीकल १२१ नुसार मयतांविरुध्द झालेले अबेटमेंट ६० दिवसात रदद करुन घेणे कायदयाने बंधनकारक असताना वादींनी ते मुदतीत रदद करुन न घेतल्यामुळे मयत प्रतिवादी क्र.१/२, १/३, १/४/१ व वादी क्र.२/१ यांचे विरुध्द दावा अबेट झालेला आहे. तसेच सदर दावेचे अपील चालू असल्यामुळे व त्यानंतर अनावधानाने मयतांविरुध्द झालेले अबेटमेंट रदद करुन घेण्याचे वादींकडून राहून गेल्याचे दिसून येते. तथापि, दाव्याच्या अंतिम निर्गिती होण्याकरिता नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून मयत प्रतिवादी क्र.१/२, १/३, १/४/१ व वादी क्र.२/१ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंट आदेश रद्द करणे क्रमप्राप्त ठरते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

**१.** वादींचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

**२.** मयत प्रतिवादी क्र.१/२, १/३, १/४/१ व वादी क्र.२/१ यांचे विरुध्द झालेला अबेटमेंटचा आदेश रद्द करण्यात येतो.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN

मिरज

**(निरंजन बा. चव्हाण)**

दिनांक : ०५/०२/२०२५

४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,

मिरज.

*****

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same, word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer. | : | Sou. A.C. Patil, Grade-3 |
| Court. | : | 4th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Miraj |
| Date. | : | 05.02.2025. |
| Order signed by<br>the Presiding Officer on. | : | 05.02.2025. |
| Order uploaded on. | : | 06.02.2025. |